परिपत्रक नं.34
(जनरल विभाग )

रयत शिक्षण संस्था, सातारा
दि. 01/09/2018

सर्वश्री शाखाप्रमुख ,
रयत शिक्षण संस्था,

यांना . . . . . .

**विषय - लोकराज्य अंकाबाबत.**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत गेली ७० वर्षे लोकराज्य हे मासिक प्रकाशित केले जाते. या मासिकातील माहिती अधिकृत, अद्ययावत व दर्जेदार असल्यामुळे लोकराज्य हे महाराष्ट्रातील अग्रेसर असे सर्वाधिक खपाचे मासिक ठरलेले आहे. लोकराज्यमधील माहिती सेवक तसेच निरनिराळया स्पर्धा परिक्षांना बसणा-या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. या अंकाची **वार्षिक वर्गणी विद्यार्थ्यांसाठी रु.६०/- व इतरांसाठी रु.१००/- आहे.**

रयत शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती वाढावी, त्यांना कसदार साहित्य वाचण्यासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी शाखेच्यावतीने या अंकासाठी सभासद होणेबाबत शिफारस आहे. तसेच आपल्या शाखेतील जास्तीत जास्त विद्यार्थी सभासद होतील यादृष्टीने सर्व विद्यार्थ्यांद्वारे पालकांपर्यंत आपण वरील माहिती पोहचवावी.

**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

प्रत माहितीसाठी रवाना -
१. मा.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, सातारा
२. सहसचिव (माध्य./उच्च शि.), रयत शिक्षण संस्था, सातारा
३. सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था,

Letter/ CircularA4-77/010918